"मराठी मंडळ सॅक्रामेंटो"चे त्रैमासिक

# अभिरुची



- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

# २०२०-२०२१ अंक # ४


- संपादकीय — हिमानी कुलकर्णी
- अध्यक्षीय — संदीप बिडये
- पसायदान — कुमार कुलकर्णी
- काजवा — स्मिता कुलकर्णी
- कविता: मुक्त झाले मी — अनिकेत गौंडाजे
- कविता: कशी असशील तू — अनिकेत गौंडाजे
- कविता: हिमवर्षाव — स्मिता कुलकर्णी
- पाककृती: वैदर्भीयन कढीगोळे — अवनी राजोपाध्ये
- चित्रकला: Door to Holiday Cheer — रिद्धी भावसार
- चित्रकला: Look Santa was here — सिद्धी भावसार
- चित्रकला: हरणांची जोडी — अनुष्का राजोपाध्ये
- चित्रकला: Albus Dumbledore — गार्गी जेजुरीकर
- कविता: Sparrows may not be Eagles — अजित नातू

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

२०२०-२०२१ वर्षातला हा शेवटचा अभिरुची अंक आज प्रकाशित होतो आहे. सर्वप्रथम तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा!! २०२१ वर्षाच्या शुभेच्छा देताना माझ्या एका अत्यंत आवडत्या कवितेच्या काही ओळी आवर्जून आठवत आहेत.

जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळुनी किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायी ठाका
सावध!ऐका पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवूनी
एक तुतारी द्या मज आणुनी !!

२०२० वर्ष हे अभूतपूर्व होतं. आव्हानात्मक होतं. एक प्रकारची काळरात्रच होती ती! पण वर्ष संपत संपता आणि २०२१ सुरु होता होता काही चांगल्या गोष्टी घडत आहेत. कोरोना लसीकरण जगभर सुरु झाले आहे आणि लवकरच परिस्थिती पूर्वपदावर येईल असा सर्वांना आशावाद वाटतो आहे. पण मंडळी, केशवसुत वरील कवितेत म्हणतात त्याप्रमाणे , "जुने" मरण पावले असले तरी ते आपल्याला भविष्याबाबत सावध करून जाते. गतवर्षाने जशी काळरात्र दाखवली, तसेच काही अमूल्य धडेदेखील शिकवले. ती शिकवण सोबत ठेवून, योग्य ती सावधगिरी बाळगून आणि एकमेकांच्या साथीने आपण नवीन वर्षांत मार्गक्रमण चालू ठेवू.

नवीन वर्षातील अंकाच्या सुरुवातीला नेहमीप्रमाणे वाचा आपले अध्यक्ष संदीप बिडये यांचे मनोगत. २०२० वर्षाचा मागोवा आणि आगामी वर्षातील काही योजना या लेखात अध्यक्षांनी त्यांच्या खास शैलीत मांडल्या आहेत. मंडळी, अध्यक्षीय वाचताना खरंच मला अगदी प्रकर्षाने जाणवलं कि आपल्या कार्यकारणीने या आव्हानात्मक वर्षात सुद्धा किती कल्पकतेने आणि सकारात्मक दृष्टीने काम केलं आहे. खरंच सर्व कार्यकारणीचे मनापासून कौतुक आणि अभिनंदन. आणि सर्वांना एका धाग्याने बांधून ठेवून सक्षम नेतृत्व करणाऱ्या आपल्या अध्यक्षांचे खास अभिनंदन!

यानंतर वाचा कुमार कुलकर्णी लिखित "पसायदान" हा लेख. संत ज्ञानेश्वर यांच्या पावन लेखणीतून जन्मलेले 'पसायदान' प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयावर ठसलेले आहे. त्या विश्वात्मक परमेश्वराकडे विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना करणारे 'पसायदान' कधीही ऐकले तरी मनाला अत्यंत उभारी देते. नवीन वर्षाची सुरुवात करायला समर्पक विषयावरील हा लेख अतिशय वाचनीय आहे. यानंतर स्मिता कुलकर्णी लिखित "काजवा" ह्या लेखात वाचा लेखिकेच्या आयुष्यात आलेल्या एका लखलखत्या काजव्याची गोष्ट. आजी आणि नातवामधील निरागस नात्याचं हे गोड़ वर्णन मनाला खूप आनंद देऊन जातं , अगदी छोट्या कॅजमीरच्या निरागस हास्यासारखंच !!

मंडळी, या वेळच्या अभिरुची मध्ये कविता अगदी मुबलक प्रमाणात आल्या आहेत. नवीन वर्षात अनेकांच्या प्रतिभेला नवे कोंब फुटत आहेत असं जाणवतंय ! अनिकेत गौंडाजे लिखित "मुक्त झाले मी" ह्या कवितेत मला जाणवली ती स्त्रीमनाची मुक्त स्पंदने आणि अनेक वर्षांच्या जबाबदारीच्या ओझ्यातून मुक्त झालेल्या मनाची कंपने! अनिकेत यांच्याच "कशी असशील तू" ह्या दुसऱ्या कवितेत वाचा एका पित्याने आपल्या मुलीबद्दल पाहिलेली स्वप्ने!. ह्या दोन्ही भावपूर्ण कविता आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरील "मुक्त" स्त्रीजीवनाचे वर्णन करतात.

यानंतर वाचा पुन्हा एकदा स्मिता कुलकर्णी लिखित "हिमवर्षाव" ही कविता. थंडीच्या ऋतूत हिमवर्षावाचे हे वर्णन वाचताना एक गरम चाय कि प्याली घेऊन शेकोटीजवळ निवांत बसावं असं वाटलं तर नवल नाही.

थंडी, बर्फ, शेकोटी आणि चहाच्या गप्पा मारून झाल्यावर आता खादीची चळवळ पुढे चालू ठेवलीच पाहिजे नाही का ? अवनी राजोपाध्ये लिखित "वैदर्भीयन कढीगोळे " ही पाककृती वाचून हिमवर्षावातली थंडी कुठल्या कुठे पळून जाईल. विदर्भ हा महाराष्ट्रातला प्रदेश अशा रुचकर पाककृतींसाठी नावाजला जातोच. थंडीच्या दिवसांत ही गरमागरम पाककृती तुम्ही नक्की करून बघा!

मंडळी आधी म्हंटलं तसं , नवीन वर्षात अनेक कलागुणांना कोंब फुटत आहेत असं दिसतंय. ह्या अंकात कवितांबरोबरच आपल्या युवा वर्गाने काढलेली चित्रे देखील खूप आहेत. रिद्धी भावसार हिने काढलेले "Door to holiday cheer", सिद्धी भावसार हिचे " Look! Santa was here", अवनी राजोपाध्ये हिने काढलेले "हरणांची जोडी" आणि गार्गी जेजुरीकर हिने काढलेले "Albus Dumbledoor" रेखाचित्र, ही सारीच चित्रे अप्रतिम आहेत !. खरंच आपली युवापिढी खूप कलागुणसंपन्न आहे. त्यांचे हे कलागुण आणि अभिरुची मधील योगदान उत्तरोत्तर वाढत जावो हीच सदिच्छा !

अंकाचा शेवट करूया एका अर्थपूर्ण कवितेने! मंडळी, आपण जेव्हा एखादे प्रेरणादायी भाषण किंवा लेख , कविता असं काही वाचतो तेव्हा त्यात बहुतांश वेळा "महत्वाकांक्षी" राहण्याचा संदेश असतो. पण अजित नातू लिखित "Sparrows may not be eagles" ही कविता वेगळ्या पद्धतीने प्रेरणा देते. प्रत्येकाचे व्यक्तित्व वेगळे आहे आणि म्हणूनच महत्वाकांक्षा सुद्धा वेगळ्या आहेत.सरसकट महत्वाकांक्षी होण्यापेक्षा आपलं वेगळेपण जपलचं नाही तर साजरं केलं पाहिजे हा सुंदर संदेश ही कविता देते. मला वाटतं २०२० वर्ष हे एक प्रकारे माणसाच्या अमर्याद महत्वाकांक्षेला अधोरेखित करणारं होतं. त्या पार्श्वभूमीवर ह्या कवितेत दिलेला संदेश अगदी चपखल वाटतो.

तर मंडळी, आता ह्या वर्षीच्या शेवटच्या अंकासाठी संपादक म्हणून लिहिलेला हा शेवटचा परिच्छेद! २०१९ मध्ये अभिरुचीच्या संपादक पदाची जबाबदारी मी स्वीकारल्यानंतर आपण ७ अंक प्रकाशित केले. तुम्हा सर्वांचे सहकार्य आणि सहभाग यामुळेच हे घडू शकलं. हे काम करता करता आपल्या परिवारातील गुणी लोकांशी संवाद साधता आला आणि खूप शिकायला मिळालं. एकूणच अभिरुचीवर काम करण्याचा हा अनुभव माझ्यासाठी वैयक्तिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करणारा होता. 'अभिरुची'ला तुम्ही दिलेल्या प्रेमाबद्दल आणि सहकार्याबद्दल तुमचे मनापासून धन्यवाद! मला हे काम करण्याची संधी दिल्याबद्दल मंडळाचे आणि विशेषतः कार्यकारिणीचे आभार. त्याचबरोबर विशेष धन्यवाद प्राची जेजुरीकर हिचे. अभिरुचीच्या संपादनकार्यात प्राचीने दिलेले योगदान आणि तिच्या मौल्यवान सूचना यामुळे अंकाच्या गुणवत्तेत मोलाची भर पडली. मंडळी, मला सांगायला खूप आनंद होतो आहे कि अभिरुचीच्या संपादक पदाची धुरा नवीन वर्षात मधुरा आणि हृषीकेश शेंडे हे दोघे सांभाळतील. हे दोघेही आपल्या MMSAC परिवारातील नवीन सदस्य आहेत. गेल्या वर्षी काही कार्यक्रमांधून शेंडे परिवारातील सदस्यांच्या कलागुणांची ओळख आपल्याला झाली आहे. मराठी संस्कृतीबद्दल असणारं प्रेम, लेखन , चित्रकला, संगीत अशा विविध कलागुणांतून दिसणारी सर्जनशीलता आणि परिवारातून मिळालेला कलेचा वारसा हे सर्व पाहता मधुरा आणि हृषीकेश अभिरुची संपादनाची जबाबदारी नक्कीच यशस्वीपणे सांभाळतील याची मला खात्री आहे. बाकी आपण अभिरुचीच्या माध्यमातून भेटत राहूच. संपादक पदाची जबाबदारी नसल्याने आता अंकात इतरत्र मुक्त लेखन करण्याची मला संधी मिळेल ही नवीन संपादकांकडून अपेक्षा! मंडळी, अभिरुचीवर तुमचा लोभ कायम असू द्या. आपणा सर्वांची 'अभिरुची' उत्तरोत्तर बहरत राहो ही सदिच्छा आणि नवीन संपादकांना मनापासून शुभेच्छा!

आपली स्नेहांकित,



**-हिमानी कुलकर्णी**

**(संपादक, अभिरुची - मराठी मंडळ सॅक्रामेंटो )**

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा !!! ह्या वर्षातील शेवटचे अध्यक्षीय लिहीत असलो तरी ऊर वगैरे भरून आलेला नाही कारण आमच्या कार्यकारिणीने पुढच्या वर्षी सुद्धा कार्यकारिणी पदांवर कायम राहण्याचा निर्णय घेतल्याने, अजून ४ अध्यक्षीय तरी आपल्याला सहन करावे लागतीलच. चला तर मग नेहमीप्रमाणे सुरुवात करूया मागील ३ महिन्यातील कार्यक्रमांचा आढावा घेऊन.

मागची बरीच वर्षे मराठी मंडळ सॅक्रमेंटोचा दिवाळी कार्यक्रम हा नेहमीच लक्षवेधक ठरला आहे कारण सर्व कलागुणसंपन्न अशा सभासदांचा उत्साही सहभाग. ह्या वर्षी इतर सर्व कार्यक्रमांप्रमाणेच हा कार्यक्रम देखील "Online" करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोजागिरीचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याने आणि सतीश आडेट्टीवारांसारखा तांत्रिक मांत्रिक आमच्याकडे असल्याने तांत्रिक बाबतीत आम्ही निर्धास्त होतो. आम्हाला काळज़ी होती ती सभासदांच्या सहभागाची, कारण त्यांना रेकॉर्डेड performances पाठवायला लागणार होते. परंतु आमच्या सभासदांनी उस्फुर्त असा प्रतिसाद देऊन आमची ही काळजी मिटवली. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनीच कमाल केली. सभागृहात सादर होणाऱ्या आपल्या नेहमीच्या पारंपरिक दिवाळी कार्यक्रमात जे प्रयोग करणे थोडे अवघडच असते ते प्रयोग ह्या निमित्ताने आपल्या सर्वांना बघता आले. काहींच्या कल्पनेला ड्रोनचे पंख लाभले तर काहींनी पंख असलेल्या कोंबडीला खुर्चीवर बसवून संवाद साधला, काहींनी मोटरसायकलवर एन्ट्री घेतली तर काहींनी स्केटबोर्डचा वापर केला. तर अशा ह्या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे, "new normal" शी जुळवून घेत, सर्वच सहभागी कलाकारांनी दाखवलेली कल्पकता! कार्यक्रमाची सुरुवात मंडळाच्या सहसचिव भगवती जालनापूरकर यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या ओळीने केली आणि कार्यक्रमाला हवा असलेला सूर मिळवून दिला. अशी सुरेख सुरुवात करून दिल्याबद्दल भगवतीचे आभार. कार्यक्रम सभागृहात असो कि online , तो सादर करायला, प्रेक्षकांना गुंतवून ठेवायला गरज असते ती कुशल सूत्र संचालकाची आणि आमच्या कार्यक्रमाला तर दोन निष्णात सूत्र संचालिका लाभल्या होत्या. कार्यक्रमाचा पूर्वार्ध सादर केला मीनल जोशी ह्यांनी तर उत्तरार्ध सांभाळला अमिता खरे ह्यांनी. दोघीनीही आपआपल्या शैलीत सुंदर संचालन केले आणि कार्यक्रम रंजक होईल ह्याची काळजी घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची शोभा वाढविल्याबद्दल मीनल जोशी आणि अमिता खरे यांचे आभार.

दिवाळीच्या कार्यक्रमातील सादरीकरणाबरोबरच, मधल्या वेळेत काही महत्वपूर्ण घोषणा केल्या गेल्या. पहिल्या विश्रांती मध्ये, आपले सचिव उमेश जाधव ह्यांनी सर्वप्रथम प्रायोजक आणि देणगीदार ह्यांचे आभार मानले आणि नंतर "मेम्बरशिप कॅरी-फॉरवर्ड" ची घोषणा करून आपल्या सभासदांना एक प्रकारे दिवाळी बोनसचा आनंद दिला. उमेश जाधवांनी ह्या सर्व घोषणा एकदम कॉर्पोरेट इंग्लिश मध्ये केल्याने, काही सभासदांनी मराठीचा आग्रह धरत चॅटवर गोंधळ घालायचा प्रयत्न केला. परंतु, जेव्हा "गोंधळ घालणाऱ्या सभासदांचे सभासद शुल्क जप्त करण्यात येईल" अशी शुद्ध मराठी धमकीवजा सूचना जारी करण्यात आली तेव्हा थोडी शांतता प्रस्थापित झाली,

दुसऱ्या विश्रांती मध्ये, सर्वप्रथम आपल्या संपादिका हिमानी कुलकर्णी ह्यांनी अभिरुचीच्या दिवाळी अंकाची औपचारिक घोषणा केली. अभिरुचीमध्ये नियमित योगदान करणाऱ्या सभासदांचे आभार मानण्याबरोबरच, दिवाळी अंकाची एक झलक त्यांनी दाखविली. आम्हाला खात्री आहे कि हिमानी कुलकर्णी आणि प्राची जेजुरीकर ह्यांनी मेहनत घेऊन संपादित केलेल्या ह्या दिवाळी अंकाचा आस्वाद सर्व रसिक वाचकांनी घेतला असणारच. सुंदर असा दिवाळी अंक सादर केल्याबद्दल संपादिका हिमानी कुलकर्णी, मदतनीस प्राची जेजुरीकर आणि सर्व सहभागी सभासदांचे आभार.

ह्या "new normal" परिस्थितीमध्ये सादर झालेल्या कार्यक्रमांमध्ये एका गोष्टीची उणीव होती ती म्हणजे "नवीन सभासदांची ओळख". सभागृह किंवा पार्कमध्ये सादर होणाऱ्या कार्यक्रमांत नवीन सभासद सहजगत्या इतर सभासदांशी जोडले जातात परंतु online कार्यक्रमात ती गोष्ट ठरवून करावी लागते आणि म्हणूनच ह्या दिवाळी कार्यक्रमात आपण दोन नवीन कुटुंबाशी संवाद साधला. मराठी मंडळाच्या विस्तारित कुटुंबात सहभागी झालेल्या "भिडे" आणि "वाडेकर" कुटुंबियांचे मन:पूर्वक स्वागत आणि ह्या कार्यक्रमात आमच्याशी संवाद साधल्याबद्दल आभार.

आधी सांगितल्याप्रमाणे सर्वच सभासदांचे कार्यक्रम खूपच सुंदर झाले आणि कार्यक्रमाची सांगतादेखील एका अप्रतिम कलाकृतीने झाली. "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी" ह्या गीतावर, महाराष्ट्रातील विविध प्रथितयश व्यक्तींच्या वेशभूषा करून, तब्बल २०+ मुलांनी सादरीकरण केले. स्नेहा टिळक ह्यांच्या कल्पनेतून साकारलेल्या, सर्व बालकलाकारांच्या वेशभूषेने नटलेल्या आणि अक्षज जोशी ह्याच्या एडिटिंगने सजलेल्या अशा ह्या कलाकृतीचे वर्णन केवळ "अवर्णनीय" असेच असू शकते.

तर, अशा प्रकारे कोजागिरीप्रमाणेच, दिवाळी कार्यक्रमदेखील तांत्रिकदृष्टया एकदम सुरळीत पार पडला आणि त्याचे श्रेय जाते ते सतीश आडेट्टीवार यांना. प्रत्येक रेकॉर्डेड परफॉर्मन्स तपासून पाहणे, कार्यक्रमादरम्यान झूम सेटिंग सांभाळणे, अशी सर्व कामगिरी सतीश ह्यांनी लीलया पार पाडली. तांत्रिकबाजू भक्कमरित्या संभाळल्याबद्दल सतीश आडेट्टीवार ह्यांचे पुन्हा एकदा आभार. ह्या बरोबरच कार्यक्रमात पडदा उघडणे, बंद होणे, टाळ्या, फटाके असे ग्राफिक special इफेक्ट्स सुद्धा टाकले गेले आणि ह्या special इफेक्ट्स साठी अमोल व अक्षज जोशीनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे विशेष आभार.

सरतेशेवटी, ज्यांच्या सहभागाशिवाय असा कार्यक्रम सादर करणे शक्य नाही त्या सर्व (४०+) सहभागी कलाकारांचे आभार आणि कार्यक्रमाला अद्भुत (सहभागी प्रेक्षकांची संख्या ७५+ ) अशी उपस्थिती देऊन सर्व कलाकारांचा उत्साह वाढवणाऱ्या प्रेक्षकांचे देखील मन:पूर्वक आभार.

खरंतर दिवाळी कंदील कार्यशाळा ह्यावर्षी आमच्या पूर्वनियोजित कार्यक्रमांत नव्हती पण तसे बघितले तर कोरोना सुद्धा नव्हता...असो, तर आम्ही विचार केला कि आपण ही कार्यशाळा online करू शकतो फक्त गरज होती ती कार्यशाळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवकाची. आमच्या सुदैवाने दीपिका रणदिवे यांनी हि जबाबदारी स्वीकारली आणि कार्यक्रमाला एक निश्चित आराखडा मिळाला. दिवाळी कार्यक्रमानंतर लगेचच दुसर्यादिवशी ही कार्यशाळा आयोजित केली होती तरीही आमच्या छोट्या सभासदांनी चांगला प्रतिसाद दिला. दीपिका रणदिवे ह्यांनी विविध वयोगटातील मुलांना हाताळत, अत्यंत सुरेख पद्धतीने ही कार्यशाळा आयोजित केली. कार्यशाळेच्या शेवटी सहभागी झालेल्या सर्व मुलांनी सुंदर असे आकाश कंदील तयार केले आणि आम्हाला खात्री आहे कि ह्या आकाशकंदिलांनी नक्कीच त्यांच्या दिवाळीची शोभा वाढवली असणार. थोडीशीच आगाऊ सूचना मिळून सुद्धा अशी कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल दीपिका रणदिवे यांचे खूप आभार.

कोडींग कॅम्पच्या यशस्वी आयोजनानंतर आमच्या युवा प्रतिनिधींना अजून एक कार्यक्रम आयोजित करण्याची मागणी होऊ लागली होती. त्यामुळे Thanks giving च्या सुट्टीमध्ये debate workshop आयोजित करण्यात आले. परत एकदा सिया जोशी हिने ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला. कार्यशाळेचे फ्लायर , RSVP फॉर्म बनवणे, कार्यशाळेची instructor शर्वणी पाटील हिच्याबरोबर समन्वय करणे अशा सर्व गोष्टी सियाने यशस्वीरीत्या सांभाळल्या. परत एकदा विविध वयोगटातील मुलांनी ह्या कार्यशाळेत सहभाग घेतला होता आणि शर्वणी पाटील हिने खूपच सहजगत्या सर्व मुलांना हाताळले. छोट्या वयोगटातील मुलांनी तर ह्या कार्यशाळेत खूपच मजा केली विशेषतः ब्रेक टाइममध्ये :) . ह्या कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी छोटीशी debate स्पर्धा आयोजित केली होती. सर्वच सहभागी मुलांनी छान तयारी केली होती आणि शर्वणी पाटील हिने सांगितलेले सर्व मुद्दे वापरण्याचा सुंदर प्रयत्न

केला. ह्या सर्व मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी (किंवा मुलांनी घरी काही वादविवाद केला तर आपली काय तयारी असावी ह्यासाठी??) काही पालक देखील उपस्थित होते, त्याबद्दल त्यांचे आभार. ह्या स्पर्धेसाठी शर्वणी पाटील आणि सिया जोशी ह्यांनी परीक्षकांची भूमिका स्वीकारली आणि महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी प्रत्येक स्पर्धकाला अभिप्राय दिला त्यामुळे स्पर्धकांना आपल्या कौशल्यात नक्कीच सुधारणा करता येईल. अशाप्रकारे पाच दिवसांची हि कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल आयोजक सिया जोशी, instructor शर्वणी पाटील आणि सर्व सहभागी मुलांचे खूप आभार.

कोडींग कॅम्प, दिवाळी कंदील कार्यशाळा, debate कार्यशाळा ह्यानंतर अशा online कार्यशाळेची मागणी वाढू लागली. नेहमीच मराठी मंडळाच्या हितचिंतक असलेल्या अमिता नातू ह्यांनी लहान मुलांसाठी एक painting workshop घेण्याची तयारी दाखविली. आधीच्या कार्यक्रमांप्रमाणेच ह्या कार्यशाळेला सुद्धा सुंदर प्रतिसाद मिळाला आणि २ दिवसांची हि कार्यशाळा खूप रंगली. अमिता हिने सर्व सहभागी मुलांचे वय, पैंटिंगचा अनुभव ह्याचे ध्यान ठेवत सर्वांना चांगले मार्गदर्शन केले. ह्या कार्यशाळेत तिने ४ पैंटिंग्स शिकवली पण त्याबरोबरच महत्वाच्या अशा सूचना दिल्या ज्या मुलांना भविष्यात नक्कीच उपयोगी ठरतील. परत एकदा एक प्रायोगिक तत्वावर आयोजित केलेल्या ह्या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व सभासदांचे आभार आणि हि कार्यशाळा यशस्वीरित्या रंगविल्याबद्दल अमिता नातू हिचे विशेष आभार.

तर मंडळी हा झाला मागील ३ महिन्यात सादर झालेल्या कार्यक्रमांचा आढावा, आता या पुढील कार्यक्रम आहे, मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा. ह्यावर्षी कोरोनामुळे आपले मकर संक्रांती विशेष हळदी कुंकू, बोरन्हाण असे कार्यक्रम आपण करू शकणार नाही. तरीदेखील वार्षिक सर्वसाधारण सभा हाच संक्रांतीचा कार्यक्रम समजून आमचे सभासद आमच्याशी गोड गोड बोलतील अशी आशा करतो. गमतीचा भाग सोडला तर आम्हाला आमच्या सभासदांकडून constructive feedback ऐकायला आवडेल. हे पूर्ण वर्ष आपल्या सर्वांसाठीच अनपेक्षित ठरले आणि आम्ही आमच्यापरीने शक्य होईल तसे कार्यक्रम देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ते करताना अनवधनाने काही चुकाही झाल्या असतील किंवा काही ठिकाणी अजून सुधारण्याची संधी असेल, तेव्हा खरंच आम्हाला तुमचा अभिप्राय ऐकायला नक्की आवडेल.

मंडळी, सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे हि कार्यकारिणी पुढील वर्षी म्हणजे २०२१-२२ साठी सुद्धा कार्यरत असणार आहे परंतु अभिरुची संपादिका हिमानी कुलकर्णी ह्यांना ह्या भूमिकेतून थोडी विश्रांती हवी आहे आणि त्याबरोबरच मंडळाच्या नियमावलीनुसार २ वर्षांने ह्या पदासाठी अर्ज मागविले जातात. हिमानीने मागील २ वर्षे हे पद सांभाळले. आपल्या कार्यकाळात त्यांनी अभिरुचीमध्ये नवनवीन कल्पना राबवल्या, नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले (आता तुम्हाला समजले असेलच कि ह्या वर्षीच्या अध्यक्षीय आणि मनोगत ह्या साठी कोण जबाबदार आहे ते), तसेच अभिरुची मध्ये नियमित योगदान करणाऱ्या मातब्बर साहित्यिकांकडून नवनवीन लेख/कविता मिळवल्या. हिमानी ह्यांच्या योगदानाबद्दल मराठी मंडळ त्यांचे खूप आभारी आहे. आम्हाला आशा आहे कि संपादिका ह्या भूमिकेत नसल्या तरीही त्या त्यांच्या साहित्यातून अभिरुची मध्ये योगदान देत राहतील, तसेच नवीन संपादक/संपादिकेला मार्गदर्शन देखील करतील. पुन्हा एकदा हिमानी ह्यांचे मन:पूर्वक आभार आणि खात्री आहे कि हि विश्रांती अल्पावधीचीच असेल.

अभिरुची संपादिकेप्रमाणेच मीनल जोशी ह्यांनादेखील IAS आणि BMM representative ह्या भूमिकेतून विश्रांती घ्यावी लागत आहे. त्यांनी २ वर्षे मंडळाला दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे खूप आभार आणि नक्कीच खात्री आहे कि नेहमीप्रमाणे त्या मंडळाला सहकार्य देत राहतील.

खरंतर मराठी शाळा स्वतंत्ररित्या कार्यरत असल्याने शाळेच्या घडामोडींविषयी अध्यक्षीय मध्ये जास्त लिहिले जात नाही, परंतु ह्यावेळी त्याला अपवाद आहे. ह्याचे कारण, मराठी मंडळाचे हितचिंतक आणि मराठी शाळेचे समन्वयक म्हणा किंवा कुलगुरू म्हणा, असे श्री. विक्रमभाऊ बोबडे, हे शाळेच्या समन्वयक पदावरून विश्रांती घेत आहेत. मागील ३.५ वर्षे त्यांनी हे पद प्रामाणिकपणे सांभाळले आणि आपल्या कार्यकाळात "परंपरा, प्रतिष्ठा व अनुशासन" ह्या स्तंभांवर आपले काम एकदम चोख बजावले. त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे आणि आशा आहे कि लवकरच ते मंडळात एखादी नवीन जबाबदारी स्वीकारून

नवीन पिढीला मार्गदर्शन करतील.

मंडळी, नेहमीप्रमाणे हे अध्यक्षीय लिहिण्याची संधी दिल्याबद्दल संपादिका हिमानी कुलकर्णी ह्यांचे आभार तसेच ज्यांच्या सूचक बदलांशिवाय हे अध्यक्षीय पूर्ण होऊ शकत नाही त्या प्राची जेजुरीकरांचे सुद्धा आभार. आपण हा अंक संपूर्ण वाचाल आणि आपल्या सूचना आमच्या पर्यंत पोहोचवाल अशी अपेक्षा करतो. ह्या अंकाचा शेवट आपण सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देऊन करतो

"सण संक्रांतीचा हा,
दिन रात्र जेथे समान...
ठेवुनी संस्कृतीचे भान,
करूया सर्वांचा मान....
देऊनी साथ एकमेकाला
वाढवू आपुल्या प्रांताची शान"



आपला नम्र,
**- संदीप बिडये**
**अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रमेंटो**

# पसायदान

७०० श्लोकी श्रीमद्भगवद्गीता आणि त्याच्यावर श्री माउलींनी ७०० वर्षांपूर्वी चढविलेले मराठी भाषेचे लेणे आणि ते आपल्याला वाचायला, त्यावर चिंतन, मनन करायला मिळणे हेच मुळी आपल्या भाग्याचे आहे. मराठी भाषिकांवर हे माउलीचे अनंत उपकार आहेत ह्यात काय संशय!

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी नेवाश्याला, प्रवरेकाठी असलेल्या मंदिरात, तेथील गावकऱ्यांना समजेल अशा मराठी भाषेत, रोजच्या व्यवहारातील भरपूर उपमा आणि उदाहरणांच्या आधाराने ९००० ओव्यांतून, श्री मद्भगवद्गीतेचा अर्थ, अत्यंत प्रेमाने आणि कळकळीने सांगितला आणि सच्चिदानंदबाबानी हे प्राकृतातील निरूपण लिहून घेतले. पूर्वीच्या काळी हाताने लिहिण्याची पद्धत होती त्यामुळे पुढे वेळोवेळी अनेकांनी पोथीरूपात श्री ज्ञानेश्वरी लिहून घरोघरी ठेवली. त्यामुळे त्या पुढे पुढे अक्षरं न लागल्यामुळे म्हणा किंवा आणखी काही कारणाने म्हणा, प्रती अशुद्ध होत गेल्या. त्यातून मग श्री एकनाथ महाराजांनी १६ व्या शतकांत त्याची एक प्रत तयार केली. तीच आजची शुद्ध केलेली श्री ज्ञानेश्वरी घरोघरी वाचली जाते.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी, आपल्या गुरूच्या सांगण्यावरून आणि त्यांच्या कृपा प्रसादामुळे, हा ९००० ओव्यांचा वाग्यज्ञ सिद्धीस नेला. शेवटी ह्या यज्ञाची सांगता, ते पसायदानाने करतात. पसायदान म्हणजे प्रसाद. महाराजांना आपण आत्यंतिक प्रेमाने माउली म्हणतो. ह्या जगांत प्रत्येक प्राणिमात्राला आपल्या आईहुन प्रिय असं काय आहे बरं?

आई जशी दोन अपत्यांपैकी जे थोडे भोळे, व्यावहारिक दृष्टया मागे पडत चाललेले असेल तर त्याच्याकडे जास्त लक्ष्य देते, त्या अपत्याची तिला जास्त काळजी वाटते, तसेच श्री ज्ञानेश्वर माउली, परमात्म्याला विसरत चाललेल्या मनुष्य प्राण्यासाठी, हा प्रसाद मागते आहे.

त्या विश्वात्मकाला श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, हा जो वाग्यज्ञ, श्री गुरु निवृत्तीनाथ ह्याच्या कृपेने आणि आपल्या कृपा प्रसादाने सिद्ध झाला त्यामुळे आपण संतुष्ट झाला असाल तर आपणापाशी माझे एक मागणे आहे ते मला प्रसाद म्हणून द्या.

व्यंकटी म्हणजे वाकडेपणा, खल किंवा खळ म्हणजे दुष्ट. पण माणसे नव्हे तर त्यांच्यातील दुष्ट प्रवृत्ती, त्याचा नाश होवो. अशा माणसांची वृत्ती सत्कर्माकडे लागो त्याची रती म्हणजे आवड वाढो. त्यामुळे एकमेकांबद्दल प्रेम वाढेल, एकमेकांत मैत्रीचे संबंध निर्माण होतील.

पापी लोकांच्या मनातील तिमिर म्हणजे अंधार जाऊन जो मूळ मनुष्यस्वभाव ( एकमेकांवर प्रीती करण्याचा, ) उगवत्या सूर्याबरोबर त्याची पहाट व्हावी म्हणजे मूळ स्वभावाचे ज्ञान होवो. नंतर श्री माउली म्हणते की अशा सर्वांना म्हणजे सज्जनांना आणि ज्यांची मती - वृत्ती - आता सन्मार्गाकडे वळली आहे, त्या सर्वांच्या सर्व इच्छा पुऱ्या होवोत.

त्यामुळे सर्व जगावर मांगल्याचा वर्षाव होईल कारण जगात अशा ईश्वरावर निस्सीम निष्ठा असलेल्या लोकांची मांदियाळी म्हणजे गर्दी, म्हणजे अशाच वृत्तीचे लोक जगभर दिसतील. अशा तऱ्हेचे लोक, जे आज थोडे बहुत दिसतात त्याऐवजी अशा ईश्वरनिष्ठ लोकांचे मेळावे ( म्हणजे आमच्या खेड्यातल्या भाषेत, अशा सज्जनांचा बाजार भरो ) एकत्र येवोत . अनवरत म्हणजे अखंड, सतत, ह्या भूमीवर अशा लोकांची दाटी होवो.

अरव म्हणजे बाग, बगीचे, एक कल्पतरूंचे झाड नव्हे तर कल्पतरूंचे मळे फुलोत. असे म्हणतात चिंतामणी असा आहे की तो माणसांना चिंतामुक्त करतो. माणसांची सर्व दुःख नाहीशी करतो. तर अशा रत्नांची गावंच्या गावं वसोत. हे अमृताचे बोल आहेत, अर्णव म्हणजे समुद्र, तो जसा कधीही आटत नाही तसे हे बोल कधीही आटणार नाहीत.

असे ईश्वरनिष्ठ लोक कसे असतील तर माउली म्हणते, असे लोक चंद्रासारखे शीतल असतील पण चंद्रावर एक डाग आहे पण हे निष्कलंक असतील. मार्तंड म्हणजे सूर्य, सूर्यासारखे तेज:पुंज असतील पण उष्मारहित असतील. अशा तऱ्हेने सगळे लोक एकमेकांचे सगे सोयरे, आप्त, नातलग, मित्र होतील.

मग काय होईल तर त्या आदिपुरुषाची अखंड आठवण होऊन त्याचे स्मरण सगळे लोक करतील, असे हे सर्व लोक पूर्ण सुखी होऊन, त्यांची कीर्ती तिन्ही लोकात होईल.

प्रत्यक्ष भगवंताने अर्जुनाला कुरुक्षेत्री, अर्जुनाची विषादामुळे आलेली ग्लानी, भ्रम दूर व्हावा आणि तो आपल्या कर्तव्यापासून दूर जाऊ नये म्हणून अठरा अध्यायाची भगवद्गीता हा ग्रंथ आणि त्यावरील हे, श्री ज्ञानेश्वर महाराजांनी मराठीतून केलेले निरूपण म्हणजे ज्ञानेश्वरी; हाच ज्यांचा दररोजच्या आयुष्यात जगण्याचा आधार आहे, हेच ज्यांचे जीवन आहे , त्यांना ह्या जगातील सर्व दृश्य आणि अदृश्य गोष्टींचा लाभ होईल.

प्रत्यक्ष जगनियंता, विश्वात्मक देवच जणु,असे श्रीगुरु श्री निवृत्तीनाथांना माउली विचारते ही माझी इच्छा पुरी होईल ना, हा दानप्रसाद मला मिळेल ना? तेव्हा श्रीगुरु निवृत्तीनाथ म्हणाले, हो; होईल बरं! हे ऐकल्यावर श्री ज्ञानेश्वर महाराज सुखी -आनंदी - झाले.

खरं म्हणजे माऊलीच्या पसायदानाचा भावार्थ इथे सांगून झाला आहे. मला जसा भावला तसा मी त्याचा अर्थ लावला आहे. काही त्रुटी, चुका झाल्या असल्यास मला आपण सर्वांनी क्षमा करावी.
पण आणखी एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाही म्हणून सांगतो. श्री नामदेव महाराज आपल्या एका अभंगाचा शेवटी म्हणतात,

ज्ञानराज माझा योग्यांची माउली, जेणे निगमावली प्रगत केली
छप्पन्न भाषेचा केला गौरव, भवार्णवी नाव तारावया
गीता अलंकारी नाव ज्ञानेश्वरी, ब्रह्मानंद लहरी प्रगटली
श्रावणाच्या मिसें बैसावें येवोनि, समरस होवोनि सुखे नांदावे
अध्यात्म विद्येचे करुनिया रूप, उजळिला दीप चैतन्याचा
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी, एक तरी ओवी अनुभवावी

माऊलीच्या ९००० ओव्यांतून एक जरी ओवी आपण अनुभवली तरी आपले उर्वरित आयुष्य आनंदात जाईल, अशी ग्वाही संत श्रेष्ठ श्री नामदेव महाराज आपल्या सगळ्यांना देत आहेत. कोणती ओवी कुणाला भावेल आणि कोणत्या ओवीमुळे आपल्याला तो आनंदाचा ठेवा मिळेल, हे ज्ञानेश्वरी वाचनातूनच आपल्याला कळेल. त्यासाठी निदान दररोज ज्ञानेश्वरीचे एक तरी पान अर्थासहित वाचावे. १ल्या अध्यायातील माऊलीच्या पहिल्या ५ ओव्या प्रथम म्हणाव्यात आणि एक पान वाचून झाल्यावर, माउलीचे पसायदान म्हणावे.

शुभम् भवतु, मंगलम् भवतु !!



**-कुमार कुलकर्णी**

# काजवा

तो मला भेटला कोव्हीडच्या लॉकडाऊनच्या काळात. सामाजिक जीवनाचं रूप पालटून टाकणाऱ्या अकल्पनीय परिस्थितीने अक्षरशः गांजून गेलेल्या काळात तो या जगात अवतरला. मित्रमैत्रिणींच्या प्रत्यक्ष भेटीगाठींसाठी मुकलेल्या नव्या जगाची सवय हळू हळू होत असताना अलगदपणे त्याने माझ्या जीवनात प्रवेश केला आणि माझे संपूर्ण जीवनच बदलून गेले. नात्याच्या एका वेगळ्याच भूमिकेत त्याने मला आणून सोडलं. हरवलेले बालपण जणू तो स्वतःबरोबर घेऊन आला.

आमच्या भेटी रोज होऊ लागल्या. प्रत्येक दिवशी नव्या उच्छाहाने मी त्याला भेटायला जाऊ लागले. निर्मळ आनंद म्हणजे नेमका कसा असतो ते मला त्याच्या सहवासात उमगू लागलं. अबोल राहून तो त्याचा सहवास खूप बोलका करायचा.

रोजच्या भेटीने आणि दीर्घ सहवासामुळे आमची मैत्री घट्ट होऊ लागली. त्याचे मोठ्ठाले पाणीदार डोळे माझ्याशी खूप काही बोलून जायचे. त्याच्या निरागस सहवासात मी तासंतास रमू लागले. त्याच्याशी खेळण्यात आणि गप्पा मारण्यात वेळ कसा आणि कुठे निघून जायचा कळायचंच नाही मला. जसजसे दिवस गेले तसतशी आमची दोस्ती वाढली. मी दिसल्यावर त्याच्या चेहऱ्यावर येणारे ओळखीचे भाव माझ्या हृदयाला आनंद देऊ लागले. हळूहळू तो माझ्याशी त्याच्या स्वतःच्या भाषेत बोलू लागला. मी म्हंटलेल्या गाण्याला त्याच्या पद्धतीने दाद देऊ लागला. हसऱ्या चेहऱ्याने माझ्याशी हितगुज करू लागला. त्याला गोष्टी सांगण्यात मी रंगून जाऊ लागले आणि त्या ऐकण्यात त्याला खूप गंमत येऊ लागली. त्याला गाणं ऐकायला आवडतं हे त्याच्या कुतूहल दाखवणाऱ्या चेहऱ्यातून स्पष्ट दिसू लागलं. मी गाणं म्हणायला सुरु केलं कि तो थांबून, एक टक बघत, लक्ष देऊन ते ऐकू लागला. मग आमची गट्टी अधिकच घट्ट झाली. त्याच्या पियानोवर मग आमचे संगीताचे धडे चालू झाले. सरगम म्हणत म्हणत वाजवणे हा आमचा नवा आवडता खेळ झाला. सरगम वाजवत असताना लक्ष देऊन तो पियानोकडे बघत असे. आता तर कीबोर्ड बोटाने कसा वाजवायचा हे सुद्धा त्याच्या लक्षात येऊ लागले आहे.

जेमतेम साडेसात महिन्याच्या सहवासाने बनलेली त्याच्याबरोबरची दोस्ती! त्याचं वेगळेपण म्हणजे त्याच्यात असलेली मोहवून टाकणारी अजाण सहजता. निर्व्याज्ज मन आणि परकेपणाच्या भावनेचा समूळ अभाव हे दोन गुण त्याच्यात इतके ओतप्रोत आहेत कि त्याच्या सहवासात मी माझी मीच बनवलेली स्वतःची प्रतिमा विसरून जाते. खिडकीतून येणारी उन्हाची तिरीप, झाडाच्या हलणाऱ्या फांद्या, भिंतीवर लावलेला स्नोमॅन, उकडलेला गाजराचा तुकडा, किंवा इस्त्रीच्या स्टॅण्डचा पाय अशा आपल्याला लक्षातही न येणाऱ्या अनेक, लहानसहान गोष्टी वेळ देऊन निरीक्षण करून, हाताने स्पर्श करून अथवा तोंडात घालून जाणून घेणारा हा माझा इवलासा अवघ्या ७ महिन्याचा मित्र मला रोज खूप काही शिकवतो. स्वतःच्या परिने गोष्टींचा अर्थ लावण्याच्या त्याच्या निरागस कृतीं पाहून येणारी प्रेरणा माझ्यासाठी फार अद्भुत आहे. हाय चेअरवर बसल्यावर हातातला चमचा परत परत खाली टाकून, वाकून त्याच्याकडे बघणे ह्या अगदी साध्या गोष्टीतला त्याचा निखळ आनंद मलाही प्रत्येकवेळा तेवढाच आनंदी करतो. आपण स्वतःच्या पूर्वकल्पित गोष्टी सोडून देऊन परत एकदा लहान बालकाच्या कुतूहलाने आजूबाजूला बघू लागलो कि कितीतरी गोष्टी नव्याने समजू लागतात, जणू बंद असलेली अनेक कवाडे आपोआप उघडू लागतात. इवल्याशा मुठीतून ओसंडणारी अनंतता, धुळीच्या एका कणात सामावलेलं जग, रानफुलामधे लपलेला स्वर्ग, अशासारख्या अनेक गोष्टींबाबत जागरूकता येऊ लागते.

खरं तर आमचं नातं आजी आणि नातवाचे आहे. पण त्याच्या रोजच्या वावरातून ओसंडणाऱ्या नैसर्गिक जिज्ञासेमुळे तो खरोखरच माझा 'जीवनाचं सार शिकवणारा' गुरु बनला आहे. समोर आलेला माणूस पहिल्या भेटीतच जेव्हा तुमच्याकडे बघून भरभरून हसतो तेव्हा तुम्हाला कसं वाटतं? एका हलक्याशा हास्यात आपला मूड बदलावण्याचं सामर्थ्य असतं. जेव्हा तो आमच्याकडे येतो तेव्हा तो तेच करतो. त्याचं ते मनमोकळं खळाळून हसणं पाहिलं कि मेंदूत एन्डॉर्फिन आणि सिरॅटोनीन यांचा मुक्त संचार जोरदार प्रमाणात सुरु होतो. मैत्रीसाठी भाषा महत्वाची नसून एक साधं हास्य पुरेसं आहे हे तो त्याच्या त्या संसर्गजन्य हास्याने दाखवून देतो. तुम्हाला हसताना पाहून आजूबाजूचे

लोकही हसतात आणि वातावरण खेळीमेळीचे होते. त्याच्या सदा हसऱ्या चेहऱ्यातून तो मला जणू सतत आठवण देत रहातो कि आयुष्य सुंदर आहे, हसत रहा, आनंदी रहा आणि आनंद पसरवत रहा...

या माझ्या छोट्या नातवाचं नाव आहे 'कॅजमीर' पण माझ्यासाठी मात्र तो सतत लखलखणारा, प्रकाशमान 'काजवा' आहे.



**-स्मिता कुलकर्णी**

# मुक्त झाले मी

मुक्त झाले मी...

कैक क्षणांचे धागेदोरे उलगडून अलगदपणे विरून गेले

अंतरंगाचे कवाड पुन्हा एकदा त्या आनंदी किरणांना

झिरपुनी देण्या उघडले

मनाला या विचारले का रे तुझी अशी व्यथा...

त्यांनी पालटूनी विचारले का नाही तुला नवी वाट

शोधण्याची हि वेडी आशा..

पाचोळे झाले सर्व जबाबदाऱ्यांचे ओझे

माझे मलाच उमजले नाही मुक्त झाले मी ...

आता नव्या वाटेवरती दिसतो नव्या ध्येयाचा मेरू मोठा

पण अनुभवाचा आणि जिद्दीचा शिदोरा तितकाच कसुनी

मी बांधलेला...

मुक्त झाले मी...

**-अनिकेत गौंडाजे**

# कशी असशील तू

कशी असशील तू

कशी दिसशील तू

माझ्या मनात नेहमी वसशील तू...

खुदुखुदू हसशील तू

मधूनच रडशील तू

माझ्या मनातले मधुर गान बनशील तू...

धावशील तू पडशील तू

नजरेआड होऊन लपशील तू

माझ्या काळजाचा ठोका बनशील तू....

नाजूक हातांचा वेढा घालशील तू

कुशीत माझ्या अलगद येशील तू

उबदार स्वप्नात हरवून जाशील तू...

नाचशील तू नटशील तू

मुक्त बागडशील तू

पैंजणाच्या नादाने आसमंत भरशील तू...

मोठी होशील तू पंखांनी भरारी घेशील तू

विश्वाचा प्रत्येक कोना व्यापशील तू

आई बाबांचा प्राण नेहमी राहशील तू....

**-अनिकेत गौंडाजे**

# हिमवर्षाव

गगनातून अलगदरित्या बरसणारे शुभ्र हिमकण
छेडती अंतरात अलौकिक तरंग
कडाक्याच्या थंडीने गोठून गेलेल्या भावनांचे
सजीव होतात हळूच दडलेले सप्तरंग

सुरुवातीला ओघळणारे इवले इवले हिमकण
होत जातात जणू पांढऱ्या शुभ्र लोकरीच्या लडी
उब देऊ लागतात गारठलेल्या धरतीला
पसरून श्वेतधवल चादरीची घडी

हरकते मन पृथ्वीमातेच्या त्या असीम उदात्ततेची कमाल पाहून
बघता बघता तिने विणलेल्या सफेद दुलईचे निर्मळ सौंदर्य निरखून
काय पाहू, किती पाहू, हिमकणांच्या जादूने अचंबित होते मन
वेडे होऊन जाते ते निसर्गाचे असे अचानक पालटलेले रुपडे न्याहळून

पाहून ती चौफेर विखुरलेली रेशमी, चमकदार, धवल हिमाची पूड
जाते धावत अधीरतेने पट्कन बूट, टोपी, हातमोजे व कोट चढवून
लूटते अविरत आनंदाने मजा बर्फाची
मनसोक्तपणे एक उनाड बालक बनून

जवळून निरखल्यावर येती ध्यानात
हिमकणांचे सूक्ष्म, कलाकुसरी, विविध षट्कोनी, स्फटिकमय आकार
अचंबित होते मन
करून निर्मितीच्या अद्‌भुत, अद्वितीयेचा आणि विविध रहस्यांचा विचार

लकाकणारी गवताची पाती, हिमवर्षाने चमचमणारी झाडांची पाने,
लहान मोठ्या वृक्षांनी लपेटलेली शुभ्र हिमवस्त्रे,
जमलेल्या हिमाच्या नक्षीने वाकलेले लहान तरु,
श्वेत वस्त्राने नटलेल्या त्या चैतन्यमय हिमाच्छादित सृष्टीचे वर्णन तरी किती करू?

समजत नाही मग ती हाडांपर्येंत बोचणारी
विलक्षण थंडी गेली कुठे पळून?
तृप्त अंतःकरणाने आणि ओठावरल्या प्रसन्न स्मिताने
परतते मी घरात भारावून जाऊन



**-स्मिता कुलकर्णी**

# वैदर्भीयन कढीगोळे

**साहित्य:**

गोळ्यांसाठी: ८ तास भिजवून उपसलेली चण्याची डाळ - २ वाट्या, आले - १ इंच, लसूण पाकळ्या -४, हिरव्या मिरच्या -२, कोथिंबीर - ३ टेबलस्पून, जिरे -१ छोटा चमचा, मीठ चवीनुसार
कढीसाठी: आंबट दही -१ वाटी, बेसन-१.५ टेबलस्पून, मोहरी- १ चमचा, हळद - पाव चमचा, हिरव्या मिरच्या - २, हिंग - पाव चमचा, कढीपत्ता पाने- १२, साखर पाव चमचा (आवडत असेल तर घालावी). विदर्भात कढीगोळ्यांची कढी आंबटच करतात.

**कृती:**

गोळ्यांसाठीचे सर्व साहित्य मिक्सर मध्ये भरड वाटून घ्यावे. ह्या मिश्रणाचे छोटे छोटे गोळे करून घ्यावे. नेहमीप्रमाणे कढी करतो तशी कढी करून घ्यावी. कढीला एक उकळी आली कि गॅस मंद करावा व त्यात डाळीच्या भरडीचे छोटे छोटे गोळे हळूहळू हलक्या हाताने कढीत सोडावे. गॅस मध्यम करावा व कढी उकळू द्यावी. गोळे शिजले कि ते कढीत वर तरंगतात. मग हलवावे. गोळे टाकल्या बरोबर एकदम हलवू नये नाहीतर गोळे फुटतील. चांगल्या २-३ उकळ्या काढाव्यात म्हणजे गोळे आतून व्यवस्थित शिजतात.

**टिपा:**

१. उपसलेली डाळ दळताना त्यात अजिबात पाणी घालायचे नाही, नाहीतर कढीत टाकल्यावर गोळे फुटतील.
२. सर्व गोळे एक्दम कढीत घालावयाचे नाहीत. आधी एक गोळा टाकून पाहायचा, फुटतो का चेक करायचे. फुटत असेल वर चिरा जात असतील तर भरडीच्या मिश्रणात अगदी थोडे, एक टीस्पून चण्याच्या डाळीचे पीठ कालवावे. चण्याच्या डाळीचे पीठ खूप पडले तर गोळे दगड होतात. म्हणून अगदी बेताबेतानेच पीठ भरडीत घालावे.
३. चिरा आल्या नाहीत आणि गोळा फुटला नाही असे पाहून सर्व गोळे कढीत हळूहळू सोडावे.

**- सौ.अवनी राजोपाध्ये**

# Door to the holiday cheer






**-रिद्धी भावसार**

## Look! Santa was here!





**-सिद्धी भावसार**

# हरणांची जोडी




**-अनुष्का राजोपाध्ये**

# Albus Dumbledore





Gargi Jejurikar

FINISHED 11/12/2020

**-गार्गी जेजुरीकर**

# Sparrows may not be Eagles

Poem Background: I received an email that was very inspirational showing how anyone can fly high like an eagle, be majestic like an eagle. I am all for that concept and it is good to have high ambitions. I agree. At the same time, a thought came to my mind about its other side as everyone cannot be 'eagle' or even want to be the top 'eagle'. Due to either personal choices or situations in life, everyone cannot fly high or want to fly high! This poem is about such people and mainly about how world would be so peaceful if everyone understands who they are, what role they got to play in life and importantly not try to be what they are not.

**एव्हरेस्टचा पायथा!** i.e **Footings underneath Everest**

Sparrows cannot be eagles!
Crows cannot be eagles!
Eagles are born as eagles!
No one can become eagle!

But still sparrows live!
Even Ants live!
They may even be happy!
Ant achieves her goal, we know that!

Everyone cannot be an eagle!
One gets here with a role to play!
Problem is everyone wants to be someone!
Everyone wants to be king!

The world has become a mess
Because one wants to be other
Sparrows want eagles wings
Each Man wants to be a superman

Sparrow should do what she can
Man should be within his limits
God has given each the framework
Play by the rule, learn to be happy

That is why there's only one "RamRajya"

When Bharat was the sparrow

Today's Ramayan is full of confusion
Today sparrows're forced to be eagle

First step of ladder fights as eagle

What will collapse if Everest base leaves!


Real Ram – the Eagle lost in social mess

Leaving sparrow in me confused

Happiness is the key to success n peace
Even a sparrow can be happy being self
Achieve what you are assigned to
World would be a better place



**-अजित नातू**





CHICAGO'S
PIZZA
With-A-Twist

sanskrit
new age indian




INCHIN'S
BAMBOO GARDEN
pan asian cuisine

RUCHI
INDIAN CUISINE



# Visit us at

## www.mmsac.org

## Like us on Facebook

Contact us at

## mmsac.committee@gmail.com